# देवाने आपल्या इस्राएल लोकांना चांगले नियम दिले

**प्रार्थना :** ''प्रिय प्रभु, तू तुझ्या लोकांची अधिक चांगल्या गोष्टींसाठी तयारी करण्यासाठी तुझे प्राचीन नियमशास्त्र दिलेस हे समजून घेण्यासाठी मुलांचे साहाय्य कर.''

मुलांच्या गरजा व वय यानुसार योग्य कार्यक्रम निवडा.


**मोशेला दहा आज्ञा मिळाल्या.** मोठ्या मुलाने किंवा शिक्षकाने इस्राएल राष्ट्रासाठी देवाने मोशेला दहा आज्ञा कशा दिल्या हे वाचावे अथवा सांगावे.


**देवाने त्याचे नियमशास्त्र घेण्यासाठी लोकांची कशी तयारी केली ते सांगा,** निर्गम 19:9-13.

**देवाने सीनाय पर्वतावर काय केले ते सांगा,** निर्गम 19:16-25

प्रत्येक आज्ञा थोडक्यात स्पष्ट करून सांगा, निर्गम 20:1-21

मुलांनी हे चित्र उतरवून घ्यावे मोठ्या मुलांनी दहा आज्ञा लिहाव्यात.




1. **पुढील प्रश्न विचारा. प्रत्येक प्रश्नापुढे वचनांसह उत्तरे दिली आहेत.**

- लोक देवाला भेटण्यास गेले तेव्हा पर्वत कसा दिसत होता? निर्गम 19:18.
- लोकांनी पर्वताला स्पर्श केला तर काय होणार होते? निर्गम 19:24.
- पर्वत ढगांनी भरून गेलेला पाहून लोकांना काय वाटले? निर्गम 20:18.
- देवाने मोशेला दिलेल्या दहा आज्ञा काय आहेत? मुलांना त्यांना आठवतील तशा आज्ञा सांगू द्या.

2. **''तुम्ही आत्म्याच्या प्रेरणेने चालविलेले आहा तर तुम्ही नियमशास्त्राच्या अधीन नाही'' गलती 5:18 याचे स्पष्टीकरण करा.**

- येशू मरण पावला व मृतातून पुन्हा उठला आणि पवित्र आत्म्याला आमच्या ठायी राहण्यास पाठविले तेव्हा पासून आम्ही जुन्या कराराच्या प्राचीन नियमाच्या अधीन नाही. रोम 6:14 हे वचन आम्हाला खात्री देते, ''तुम्ही नियम शास्त्राधीन नाही, तर कृपेच्या अधीन आहा.''
- येशूने इस्राएल राष्ट्राला दिलेले जुने नियमशास्त्र परिपूर्ण केले, मत्तय 5:17.



- आमचे देवाच्या कृपेने तारण झाले आहे. प्राचीन नियमशास्त्राचे पालन केल्याने नाही तर त्याच्या पवित्र आत्म्याच्या परिवर्तन करण्याच्या कार्याने, इफिस. 2:8-10



- नव्या कराराच्या अधीन राहून आम्ही येशूच्या आज्ञांचे भीतीने नाही तर प्रीतीने आज्ञापालन करतो. त्याने म्हटले, ''माझ्यावर तुमची प्रीती असली तर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल'' योहान 14:15.

  **येशूने** अनेक गोष्टी करण्याची आज्ञा केलेली आहे. आपल्याला त्याच्या आज्ञांचा सारांश सात आज्ञांमध्ये करता येईल. प्रे. कृ. 2:37-47 मध्ये विश्वासणारे ह्याच आज्ञांचे पालन करीत होते:

  1. पश्चात्ताप करा, विश्वास ठेवा आणि पवित्र आत्म्याने परिपूर्ण व्हा.
  2. बाप्तिस्मा घ्या.
  3. प्रीती करा आणि क्षमा करा.
  4. प्रभुभोजनाचा विधी करा.
  5. प्रार्थना करा.
  6. दान द्या.
  7. शिष्य करा.

**3. मोशे आणि दहा आज्ञा ह्या वृत्तांताचे नाट्यीकरण करा.**

ही नाटिका उपासनेमध्येच सादर करण्याची व्यवस्था करा. मुलांना शिकवितांना त्यांच्याकडून पाच भूमिकांची तयारी करून घ्या 1) निवेदक: वृत्तांताचा सारांश करा व मुलांना संवाद पाठ करण्यास मदत करा 2) देवाची वाणी 3) मोशे 4) पौल 5) इस्राएल लोक (लहान मुले).

**निवेदक:** ''इस्राएलाचे नवे राष्ट्र अनेक हजार लोक, कोणत्याही नियमांशिवाय रानावनात भटकत होते. देवाने त्याचे पवित्र नियमशास्त्र स्वीकारण्यासाठी त्यांची तयारी केली. देव त्यांच्या नेत्याला मोशेला काय सांगतो ते ऐका.''

**देवाची वाणी:** निर्गम 19:9-15 ही वचने मोठ्याने वाचा.

**निवेदक:** ''इस्राएल लोक काय म्हणतात ते ऐका.''

**इस्राएल लोक:** मोठ्याने म्हणा, ''पर्वतावरचा तो धूर बघा!'' विजा चमकत आहेत बघा'' ''गडगडाटाची तर मला खूप भीती वाटते'' ''आपल्याला देवाजवळ जाता येणार नाही, गेलो तर आपण मरून जाऊ!''

**निवेदक:** निर्गम 19:16-20 वाचून मग म्हणा, ''देव मोशेला काय सांगत आहे ते ऐका.''

**देवाची वाणी:** निर्गम 19:21 मधून देवाचे शब्द मोठ्याने वाचा.

**निवेदक:** सांगा देवाने मोशेला वर पर्वतावर येऊन लोकांसाठीचे नियमशास्त्र घेण्यास सांगतो मग म्हणा, ''पर्वतावर देव मोशेशी काय बोलतो ते ऐका.''

**मोशे:** खुर्चीवर चढून म्हणा, ''आम्ही ह्या नियमांचे पालन करू म्हणजे तू आम्हाला आशीर्वाद देशील.''

**निवेदक:** ''गलती 5:18 वचन सांगते, 'तुम्ही आत्म्याच्या प्रेरणेने चालविलेले आहा तर तुम्ही नियमशास्त्राच्या अधीन नाही' पुढे अनेक वर्षांनी, देवाने नवा करार स्थापन केल्यानंतर प्रेषित पौलाने काय म्हटले ते ऐका.''

**पौल:** ''येशू आमचे तारण व्हावे यासाठी मरण पावला. आपण नियमशास्त्राच्या अधीन नाही. आपण प्रेमाने येशूच्या आज्ञा पाळतो.''

**इस्राएल लोक:** ओरडून म्हणा, ''असे आहे तर आपल्याला आता देवाचे नियमशास्त्र मोडता येईल!'' ''आम्हाला आमच्या मनाप्रमाणे वागता येईल!'' ''चला पातक करू या, म्हणजे देव आम्हाला अधिक क्षमा करील आणि आमच्यावर जास्त प्रीती करील.''


**पौल:** ''नाही! मुळीच नाही! देव पवित्र आहे! आपण प्रीतीने देवाच्या आज्ञाचे पालन करतो. त्याने आपल्याला देवावर आणि एकमेकांवर प्रीती करण्यास सांगितले आहे. त्याचा पवित्र आत्मा आमच्या अंत:करणांत प्रीती उत्पन्न करितो. आम्ही प्रीती करतो तर आम्ही खून किंवा चोरी करणार नाही; तसेच मूर्तींची उपासना करणार नाही. देवाला संतोष वाटेल असेच आम्ही वागू.''

**इस्राएल लोक:** मोठ्याने ओरडा ''देव काय धूर आणि विजांतून पर्वतावर येणार आहे का?'' ''तो खूप दूर आणि अत्यंत पवित्र आहे. आपल्याला त्याच्याजवळ जाता येणार नाही!'' ''मला तर त्याच्याशी बोलायची पण भीती वाटते!''

**पौल:** ''नाही! नाही! नाही! नव्या करारामध्ये, देव आमच्या पासून आता दूर नाही. तो आमच्या ठायी राहतो, वडिलांशी बोलावे तसे आम्हाला त्याच्याशी बोलता येते. त्याच्याशी बोलायची आता आम्हाला भीती वाटत नाही.''

**निवेदक:** नाटिका संपल्यावर मुलांना धन्यवाद द्या. त्यांच्याकडे मोठ्या लोकांसाठी प्रश्न आहेत का ते विचारा (त्यांच्याकडून भाग 2 मधील प्रश्न प्रौढांना विचारण्याची तयारी करून घ्या.)

**चर्चा करा.** मुलांना विचारा, ''जुने नियमशास्त्र आणि आता आपण येशूचे आज्ञापालन करतो यामध्ये काय फरक आहे?'' (त्यांना उदाहरणे देण्यास सांगा)



धुराने व्यापलेल्या एका पर्वताचे चित्र काढा, मुले ते उतरवून घेतील. उपासनेच्या वेळी हे चित्र त्यांनी मोठ्यांना दाखवून यातून देवाचा पवित्रपणा दिसतो हे स्पष्ट करावे.

**पाठ करा** मत्तय 7:12

**कविता:** तीन मुलांना स्तोत्र 19:7,10 व 11 यातून प्रत्येकी एक वचन म्हणण्यास सांगा.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू तू पवित्र आहेस तुला आमच्या पातकाचा राग येतो. आमचे पातक आम्हाला दाखवून दिल्याबद्दल धन्यवाद, आता आम्ही पश्चात्ताप करून येशूमध्ये क्षमा मिळवू, नियमशास्त्र सांगते म्हणून नाही, तर आमचे तुझ्यावर प्रेम आहे म्हणून तुझ्या आज्ञा पाळण्याची आमची इच्छा आहे.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net